# जिल्हा परिषद, नाशिक

## ई-निविदा सुचना क्र.- १/२०१४-२०१५

समाज कल्याण विभागाकडील योजना शासकीय अंध शाळा नासिक या शाळेसाठी सन २०१४-१५ या वर्षात किराणा व अन्न धान्य व भाजीपाला पुरवठा करणे कामी पुरवठादार यांची निवड करणेसाठी ई-निविदांव्दारे दोन पाकीटे पध्दतीने निविदा मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | कामाचे वर्णन | अंदाजीत रक्कम | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| १ ) | शासकीय अंधशाळा नासिक या शाळेसाठी किराणा व अन्न धान्य पुरवठा करणे | रु. ६,००,०००/- | रु. ६०००/- |
| २) | शासकीय अंधशाळा नासिक या शाळेसाठी भाजीपाला पुरवठा करणे | रु. २,००,०००/- | रु. २०००/- |

१) सर्व निविदा प्रक्रीया फक्त ऑनलाईन राहील.

२) डाउनलोड करणे योग्य निविदेचा कोरा फार्म , नियम व अटी इत्यादी संबधाने सर्व माहीती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

३) निविदेची किंमत रु.२००/- असून त्या रकमेचा धनाकर्ष मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. नाशिक यांचे नांवे नाशिक येथे अदायगी होणारा पाकीट क्र.१ मध्ये इतर कागदपत्रासोबत सादर करावा लागेल.

४) संकेतस्थळावरुन निविदा डाउनलोड करणे व अपलोड करणेचा कालावधी दिनांक २३/८/२०१४ पासून २९/८/२०१४ रोजी १७.०० वाजेपर्यंत राहील.

५) निविदाधारकाने देकारा सोबत अपलोड केलेल्या खालील प्रमाणे पैसे भरलेच्या पावतीच्या मुळप्रती दि.३०/८/२०१४ रोजी १४.०० वाजेपर्यंत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नासिक , फोन क्र. ०२५३-२५०२२५१ यांचे कार्यालयात सादर कराव्या लागतील.

अ) निविदेच्या किमतीचा रु. २००/-

ब) बयाना रक्कम अन्नधान्य किराणा करीता रु. ६०००/-रु. व भाजीपाला करीता रु २०००/- मात्र

**निविदेची फी रक्कम व बयाणा रक्कम ही RTGS/NEFT/NET Banking व्दारे मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नाशिक जिल्हा कोषागार शाखा येथे खाते क्रमांक 34022119963 ISFC Code-SBIN0000437 मध्ये निविदा फी रक्कम व इसारा रक्कम भरणा करुन त्याची पावती स्कॅन करुन निविदा भरतेवेळी अपलोड करावी.**

६) ई-निविदेसाठी अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या सत्यप्रती दि.३०/८/२०१४ रोजी १४.०० वाजेपर्यंत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नासिक फोन क्र.०२५३-२५०२२५१ यांचे कार्यालयात सादर कराव्या लागतील. अन्यथा ई-निविदा ग्राहय मानली जाणार नाही.

७) www.mahatenders.gov.in या संकेतस्थावर अपलोड केलेल्या निविदेचा तांत्रीक माहीतीचा भाग दि.३०/८/२०१४ रोजी १६.०० वाजता समाज कल्याण विभाग, जि.प. नाशिक यांचे कार्यालयात ऑनलाईन पध्दतीने उघडणेत येईल.

८) भाजीपाला या बाबी करीता पुरवठा धारक स्थानिक असावा.

९) निविदेचा देकाराचा भाग उघडणेची तारीख व वेळ निविदाधारकास ई-मेल/दुरध्वनी / लघु संदेशाव्दारे कळविणेत येईल.

१०) कोणत्याही स्वतंत्र अटींची निविदा स्विकारली जाणार नाही. कोणतेही कारण न दाखवता एक किंवा सर्व निविदा नाकारणे अथवा स्विकारणेचा अधिकार राखुन ठेवला आहे

११) ई-निविदा संबधाने अधिक माहीती जिल्हा समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद नासिक, फोन क्र. ०२५३-२५०२२५१ यांचे कार्यालयात उपलब्ध राहील.

**स्वाक्षरीत /- xxx**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

# जिल्हा परिषद, नाशिक.
## ई- निवीदा सुचना क्रमांक - १ /२०१४-२०१५

समाज कल्याण विभागाकडील योजना शासकीय अंध शाळा नासिक या शाळेसाठी सन २०१४-१५ या वर्षात किराणा व अन्न धान्य व भाजीपाला पुरवठा करणे कामी पुरवठादार यांची निवड करणेसाठी ई-निविदा दोन पाकीटे पध्दतीने मागविणेत येत आहे.

निविदेचा डाउनलोड करणे योग्य कोरा फॉर्म, नियम व अटी ईत्यादी संबधाने सर्व माहीती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. संकेत स्थळावरुन निविदा डाउनलोड करणे व अपलोड करणेचा कालावधी दि.२३/८/२०१४ पासून २९/८/२०१४ रोजी १७ वाजेपर्यंत राहील. ई- निविदा संबंधाने अधिक माहीती जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नासिक फोन क्र.०२५३-२५०२२५१ यांचे कार्यालयात उपलब्ध राहील.

**स्वाक्षरीत /- xxx**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक**

# जिल्हा परिषद, नाशिक.
## ई- निविदा सुचना क्र. १ /२०१४-२०१५

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **कामाचे नाव** | : | शासकीय अंधशाळा नासिक या शाळेसाठी अन्न धान्य, किराणा व भाजीपाला पुरवठा करणे कामी पुरवठादार यांची निवड करणे |
| २. | **निविदा अर्जाची किंमत (परत न मिळणारे)** | : | १)अन्नधान्य,किराणा या बाबी करीता रु.२००/- (रु. दोनशे मात्र)<br>२)भाजीपाला या बाबी करीता रु.१००/- (रु. शंभर मात्र) |
| ३. | **संकेत स्थळावरुन निविदा फॉर्म डाउनलोड करणे व बीड अपलोड करणे** | : | दि.२३/८/२०१४ ते २९/८/२०१४ सायंकाळी ५.०० वा. पर्यंत |
| | **बयाणा रक्कम** | : | अन्नधान्य किराणा या बाबी करीता रु.६०००/- व भाजीपाला या बाबी करीता रु २०००/- . |

**टिप :- निविदेची फी रक्कम व बयाणा रक्कम ही RTGS/NEFT/NET Banking व्दारे मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नाशिक जिल्हा कोषागार शाखा येथे खाते क्रमांक 34022119963 ISFC Code-SBIN0000437 मध्ये निविदा फी रक्कम व इसारा रक्कम भरणा करुन त्याची पावती स्कॅन करुन निविदा भरतेवेळी अपलोड करावी.**

**"निविदा फक्त ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन स्विकारली जाईल."**

## शासकीय अंध शाळा नाशिक या संस्थेसाठी अन्न-धान्य , किराणा व इतर साहित्य पुरवठा करणे कामी पुरवठादार निश्चित करणे साठी आवश्यक असलेले नियम व अटी

सर्व निविदा प्रक्रीया फक्त ऑनलाईन राहील. निविदा अपलोड/डाउनलोड करणे अथवा या निविदेसंबधाने सर्व सुचना व त्या बाबतची कार्यवाही यापुढे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरच राहील. निविदा स्विकृतीसाठी खालील प्रमाणे कागदपत्र PDF or Scan Copy Format मध्येच वरील संकेत स्थळावर अपलोड करणेत यावी.

### अ) पाकीट क्रमांक १ : तांत्रिक कागदपत्र

१) बयाणा रक्कम रु.६०००/- (रुपये सहा हजार मात्र)

२) निविदेच्या फी रु.२००/- ( रुपये दोनशे मात्र)

**बयाणा रक्कम व निविदा फी रक्कम RTGS/NEFT/NET Banking व्दारे मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद नाशिक जिल्हा कोषागार शाखा येथे खाते क्रमांक 34022119963 ISFC Code-SBIN0000437 मध्ये निविदा फी रक्कम व इसारा रक्कम भरणा करुन त्याची पावती स्कॅन करुन निविदा भरतेवेळी अपलोड करावी.**

३) शॉप ॲक्ट नोंदणी अद्यावत प्रमाणपत्राची प्रत.

४) वॅट व सेल्स टॅक्स नोंदणी प्रमाणपत्र.

५) वॅट व सेल्स टॅक्स भरणा निपटारा प्रमाणपत्र अद्यावत दिनांक ३१/३/२०१४.

६) अन्न व औषधी प्रशासन कार्यालया कडुन अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदयाखालील प्रमाणपत्र.

७) सहकारी संस्थेच्या बाबतीत मागील ३ वर्षाचे शासनाकडुन/प्राधिकृत संस्थेकडुन केलेल्या लेखापरिक्षणाचे

८) अहवाल.

९) पुरवठा विभागाकडील अन्नधान्य साठा व विक्री परवाना

१०) सहकारी संस्थांनी ई-निविदा भरणेबाबत त्यांचे पदाधिकाऱ्यांचा ठराव आणि ज्या व्यक्तिच्या नावाने ई-निविदा

११)भरण्याचे अधिकार दिलेले आहेत ते प्राधिकार पत्र जोडावे.

### ब) पाकीट क्र. २ : व्यापारी देकार

१) निविदा उघडतांना सर्व निविदाधारकांनी PDF फॉर्ममध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांची तपासणी मुळ कागद पत्रावरुन कमीटीव्दारे करणेत येईल.वरील प्रमाणे संपूर्ण कागदपत्रे परीपूर्ण असलेल्या निविदाच विचारात घेतल्या जातील अन्यथा निविदा रदद करणेत येईल व त्या निविदाधारकांचे ऑनलाईन बीड उघडणेत येणार नाही.

२) निविदेमधील सर्व विवरण पत्रातील दर नमुद करणे आवश्यक राहील.

३) निविदेमधील दर सर्व करासह असावेत. देयकाचे अदायगी रकमेतून आयकर नियमानुसार कपात करणेत येईल.

४) ई-टेंडरींगद्वारा प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांचाच विचार केला जाईल. या कार्यालयास परस्पर दिलेल्या ई -टेंडरींग पुर्वीच्या प्रस्तावांचा व नंतर येणाऱ्या प्रस्तावांचा विचार संस्था निश्चितीसाठी केला जाणार नाही.

५) सुरक्षा अनामत-ज्या निविदाधारकांची ई निविदा स्विकृत केली जाईल त्या निविदाधरकांनी पुरवठा करावयाच्या एकुण किंमतीच्या ५ % एवढी सुरक्षा अनामत रक्कम नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. जिल्हा परीषद नाशिक शाखा येथे चलनाने भरणे आवश्यक आहे. सदर रकमेवर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.

६) यशस्वी निविदा धारकाने ई निविदा स्विकृतीच्या दिवसापासुन आठ दिवसांच्या आत सुरक्षा रक्कमेचा भरणा केला नाही तर त्याची ई निविदा रद्द करण्यात येवुन निविदेसोबत भरणा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

७) अन्न धान्य, किराणा व ईतर साहित्य यांची खरेदी/मागणी आवश्यकतेनुसार कमी जास्त होऊ शकेल.

८) सदर पुरवठयाचा कालावधी हा किमान शैक्षणिक वर्षासाठी राहील.

९) अन्न धान्य व किराणा यांचा पुरवठा मागणीनंतर ७ दिवस या कालमर्यादेतच पूर्ण करणे आवश्यक राहील.

१०) पुरवठा पूर्ण केलेनंतर अधिक्षक, शासकीय अंधशाळा नाशिक यांचे पुरवठा पूर्ण केले बाबतचे प्रमाणपत्र, असलेशिवाय देयक अदा केले जाणार नाही.

११)निविदाधारकाने नमुद केलेले दर हे सर्वकरांसहीत जकात, मुल्यावर्धीन कर, वाहतुक खर्च, चढाई, उतराई, पॅकींग व शासकीय अंधशाळा, नाशिक पर्यंत पोहोच करणे इत्यादीसह असावेत.

१२) निविदाधारकाने ई निविदेसोबत अन्नधान्य अन्न व औषधी प्रशासन विभागाने प्रमाणित केलेले/ तपासणी अहवालानुसार प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. प्रमाणित अहवाल नसल्यास निविदेचा विचार केला जाणार नाही. तसेच मंजूर झालेल्या निविदाधारकास त्याने दिलेल्या नमुन्याप्रमाणे साहित्यांचा पुरवठा करावा लागेल. नमुन्याप्रमाणे साहित्य नसल्यास त्याचा स्विकार केला जाणार नाही.

१३) साहित्याचा पुरवठा कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते १८.०० या कालावधीत शासकीय अंधशाळा, नाशिक येथे पाहोच करावा लागेल.विलंबाचा पुरवठा :- जर पुरवठाधारकाने मागणी केल्यापासून सात दिवसात पुरवठा केला नाही तर सदर मागणी नोंदविलेल्या साहित्यांच्या किंमतीच्या (अर्धा टक्का) प्रतिआठवडा या दराने दंड करण्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक हे सक्षम आहे.

१४) पुरवठा केलेल्या साहित्यांचे प्रदान संबंधीत अधिका-यांना पुरवठा केलेले साहित्य ई निविदे नुसार व चांगल्या प्रती मध्ये प्राप्त झाल्यावर केले जाईल.बील अदा करण्यास विलंब झाल्यास रकमेवर व्याज दिले जाणार नाही.

१५) मंजुर पुरवठाधारक यांनी साहित्याचा पुरवठा स्वत:च करावयाचे आहे.त्यांना उपपुरवठादार नेमता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१६) पुरवठा कालावधीत साहित्य पुरविण्यास जर पुरवठाधारक असमर्थ ठरल्यास किंवा पुरवठाधारकाने पुरवठा केलेल्या साहित्यामध्ये काही साहित्य अस्विकृत झालेले असल्यास असे अस्विकृत साहित्य मुदतीत बदलून दिले नाही तर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक हे त्यांना योग्य वाटेल अशा पुरवठाधारकाकडून त्यांना योग्य वाटणाऱ्या अशा दराने उर्वरीत साहित्य खरेदी करण्यास सक्षम राहतील.

(अ) कसूरदार पुरवठाधारकाची पुरवठा करण्याची तयारी विचारात घेतली जाणार नाही.

(ब) कसूरदार पुरवठाधारकास दोन्ही दरांमधील किंमतीतील फरक अथवा १० टक्के रक्कम यापैकी जी जास्त/अधिक रक्कम असेल तेवढया रक्कमेचा दंड करण्यात येईल.

(क) जर कसूरदार पुरवठाधारकाने दंड रक्कमेचा भरणा केला नाही तर त्याची अनामत रक्कमेतून वजाती करण्यात येवून त्याचे नांव काळ्या यादीत समाविष्ठ केले जाईल.व जिल्हा परिषदेच्या पुढील कोणत्याही खरेदीच्या वेळी त्यांचे निविदेचा विचार केला जाणार नाही.

१७) निविदेमधील मंजूर दर हे सन २०१४-१५ या शैक्षणिक कालावधी पर्यंत अथवा पुढील आदेश होईपावेतो बंधनकारक राहतील व त्या कालावधीत त्याच दराने काम करावे लागेल. कोणतेही कारण न दाखवता एक किंवा सर्व निविदा नाकारणे अथवा स्विकारणेचा अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नासिक यांनी राखून ठेवला आहे.

१८) दर पत्रक मंजुरी व दर स्विकृती नंतर यशस्वी निविदा धारकास रुपये १००/- (रुपये शंभर) चे कोर्ट स्टॅम्प वर करारनामा करुन द्यावा लागेल. कोणत्याही अटीवर निविदा / निविदा फॉर्म पोष्टाने पाठविले जाणार नाहीत. अथवा पोष्टाने / कुरीयरने स्विकारले जाणार नाहीत.

१९)निविदा मंजुरी संदर्भात अथवा कामाचे संदर्भात पोष्टाची दिरंगाई विचारात घेतली जाणार नाही.

२०) कामाचे सोईने व प्रशासकीय बाबीमध्ये काही कारणाने कामाचे पध्दतीत बदल करणेत आला व नवीन अटी तयार करणेत आल्या तरी त्या निविदा धारकावर बंधनकारक राहतील.

२१) दर पत्रकांबाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. नाशिक, यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम राहील त्यास न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

२२) कार्यालयात एकदा सादर केलेली ई-निविदा कोणत्याही अटीवर मागे घेता येणार नाही अथवा त्या आशयाचे कोणतेही पत्र विचारात घेतले जाणार नाही.

२३) दरपत्रकात नमुद केलेले सर्व अन्न धान्य व किराणा दर पुरवठाधारकाने भरणे अनिवार्य आहे.

२४) कोणत्याही स्वतंत्र अटी व शर्ती असलेली निविदा विचारात घेतली जाणार नाही.

२५) निविदा धारकांचे प्रत्येक बाबीमध्ये आलेल्या कमीत कमी दराचे सिलींग करुन नंतर निविदा धारकांना त्या दरांमध्ये कामाबाबत विचारण्यात येईल व त्या प्रमाणे करारनामा करुन द्यावा लागेल.

**स्वाक्षरीत / xxx**
**जिल्हा समाज कल्याण अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**स्वाक्षरीत / xxx**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, नाशिक.**

## विवरण पत्र अ - अन्न धान्य व किराणा व इतर साहित्य पुरवठा करणे कामी साहित्यांचे दर देणे कामी नमुद करावयाचे दर पत्रक

| अ.क्र. | तपशिल | एका वर्षासाठी लागणारे अंदाजीत साहित्य | दराचे परिमाण | किराणा मालाचे दर |
|---|---|---|---|---|
| १ | गहू चांगल्या प्रतीचा २१८९ | ५७०० किलो | प्रति किलो | |
| २ | तांदुळ गरी कोळपी | १४२५ किलो | प्रति किलो | |
| ३ | मुगदाळ चांगली | १९० किलो | प्रति किलो | |
| ४ | तुरदाळ चांगली | १९० किलो | प्रति किलो | |
| ५ | उडीददाळ काळया सालीची | १९० किलो | प्रति किलो | |
| ६ | मसूरदाळ | १९० किलो | प्रति किलो | |
| ७ | मठदाळ | १९० किलो | प्रति किलो | |
| ८ | हरभरा | १९० किलो | प्रति किलो | |
| ९ | मठ चांगले | १९० किलो | प्रति किलो | |
| १० | हिरवा मुग | १९० किलो | प्रति किलो | |
| ११ | चवळी | १९० किलो | प्रति किलो | |
| १२ | हिरवा वाटाणा | १९० किलो | प्रति किलो | |
| १३ | जाड पोहे | १०० किलो | प्रति किलो | |
| १४ | साबुदाणा | २५ किलो | प्रति किलो | |
| १५ | रवा | ११४ किलो | प्रति किलो | |
| १६ | बारीक मीठ (टाटाचे) | २८५ किलो | प्रति किलो | |
| १७ | शेंगदाणे लाल | ४२० किलो | प्रति किलो | |
| १८ | साखर सी ग्रेड | २८५ किलो | प्रति किलो | |
| १९ | काळा मसाला ॲगमार्क | १४४ किलो | प्रति किलो | |
| २० | मोहरी ॲगमार्क | ७६ किलो | प्रति किलो | |
| २१ | जिरे ॲगमार्क | ७६ किलो | प्रति किलो | |
| २२ | हळद दळलेली ॲगमार्क | ७६ किलो | प्रति किलो | |
| २३ | लाल मिरची पावडर ॲगमार्क | २३६ किलो | प्रति किलो | |
| २४ | सोयाबीन तेल मुरली | ३८ डब्बे | १५ किलोचा डबा | |
| २५ | वनस्पती तूप डालडा | ४० किलो | प्रति किलो | |
| २६ | निरमा पावडर | ५५ किलो | प्रति किलो | |
| २७ | खोबरेतेल ॲगमार्क | ४८ किलो | प्रति किलो | |
| २८ | कोलगेट टूथ पावडर १०० ग्रॅम डबा | ४५० नग | प्रति नग | |
| २९ | लाईफबॉय साबण १७५ ग्रॅम | ४५० नग | प्रति नग | |
| ३० | व्हिल साबण २०० ग्रॅम | ४५० नग | प्रति नग | |
| ३१ | व्हीम बार भांडयाचा साबण २०० ग्रॅम | ९५ नग | प्रति नग | |
| ३२ | ॲसिड टायगर | ९० लिटर | प्रती लिटर | |
| ३३ | फिनाईल | ९० लिटर | प्रती लिटर | |
| ३४ | केरसुनी | १०० नग | प्रति नग | |
| ३५ | खराटा | ५० नग | प्रति नग | |
| ३६ | सफाई ब्रश | ५० नग | प्रति नग | |
| ३७ | टयुब रॉड फिलीप्स | २० नग | प्रति नग | |

वरील प्रमाणे अन्नधान्य, किराणा व ईतर साहित्याचे दर आम्ही नमुद करत असुन निविदे मधील अटी व शर्तीचे अधिन राहून काम करणेस तयार आहोत.

**निविदा धारकाची सही व शिक्का**